www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार मराठी

तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 357  शुक्रवार दि. 12 सप्टेंबर २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : 6  RNI MAHMAR/2023/89514

# ‘आमच्या जीआरला हात लावला तर ओबीसी आरक्षणालाही कोर्टात आव्हान देऊ’ ; जरांगे




वडीगोद्री (जालना): मराठा आरक्षणाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्याच्या भूमिकेवरून मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. “तुम्ही मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान दिले, तर आम्हीही ओबीसी आरक्षणाला कोर्टात आव्हान देऊ. आमचा जीआर खूप रक्त जाळून मिळवला आहे, त्यात फेरफार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मराठे कोट्यवधींच्या संख्येने रस्त्यावर दिसू,” असा आक्रमक इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. अंबड तालुक्यातील अंकुश नगर येथील निवासस्थानी माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, “भुजबळांना मराठा आणि सरकारची मने जुळलेली आवडत नाही. त्यांना फक्त ओबीसीच्या नावाखाली राजकीय पद हवे आहे.” ते पुढे म्हणाले की, भुजबळ फक्त आपल्या स्वार्थासाठी ‘ओबीसी, ओबीसी’ करत आहेत आणि इतर जातींना मराठ्यांपासून तोडण्याचे काम करत आहेत. हा भुजबळांचा डाव आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आला असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला.

**१९९४ च्या जीआरला आव्हान देणार**

जरांगे पाटील यांनी यावेळी ओबीसी आरक्षणासंदर्भात एक मोठा इशारा दिला. ते म्हणाले, “तुम्ही जर आमच्या जीआरला काही करू शकलात, तर तुमच्या १९९४ च्या जीआरला आणि ५० टक्क्यांच्या वरच्या २ टक्के आरक्षणालाही धोका आहे, हे लक्षात ठेवा. तुम्ही याचिका दाखल करायला लागलात तर आम्ही सुद्धा आता १९९४ च्या जीआर संदर्भात याचिका दाखल करणार आहोत.” त्यासाठी सर्व कागदपत्रे वकिलांनी तयार केली असल्याचे त्यांनी सांगितले. ५० टक्क्यांच्या वर २ टक्के आरक्षण ठेवता येत नाही, ही बाजूही ते न्यायालयात मांडणार असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले.

**पंकजा मुंडेंच्या वक्तव्यावरून सावध राहण्याचा सल्ला**

पंकजा मुंडे यांच्या कथित वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले, “मी पंकजा मुंडे काय बोलल्या, ते ऐकले नाही, पण मला वाटत नाही की त्या असं बोलतील. जर त्या असं बोलल्याच असतील तर मराठ्यांनी सावध होणे गरजेचे आहे.” ते पुढे म्हणाले, “मराठ्यांच्या मतांवर ज्यांचे राजकीय करिअर मोठे झाले, तेच नेते जर कुणबी प्रमाणपत्र निघाले असूनही गोरगरीब मराठा लेकरांच्या मुळावर घाव घालत असतील तर हे योग्य नाही.” यावेळी त्यांनी मराठवाड्यातील आणि बीड जिल्ह्यातील मराठा नेत्यांना जातीचा विचार करून एकजुटीने काम करण्याचा सल्ला दिला. “आपले खरे आरक्षण असून हे जर बोगस म्हणणारे असतील तर हे १६ टक्के बोगस आरक्षण खात आहेत, त्याविषयी सुद्धा आपल्याला आवाज उठवावा लागेल,” असेही ते म्हणाले.

## कै. नारायण काकडे यांचा दशक्रियाविधी निमित्त राजेंद्र गाढवे महाराज यांची प्रवचन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी (प्रतिनिधी) : कुंबेफळ (ता. आष्टी, जि. बीड)**

येथील ज्येष्ठ, साधेपणाचे मूर्तिमंत उदाहरण ठरलेले व्यक्तिमत्त्व कै. नारायण विठोबा काकडे यांचे दि. ०४ सप्टेंबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून "सहवास जरी सुटला तरी स्मृती सुगंध देत राहील" अशा शब्दांत ग्रामस्थांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

कै. काकडे यांनी आयुष्यभर आपल्या प्रामाणिकपणाने, कष्टाळूपणाने व धार्मिक वृत्तीने समाजात आदर मिळवला. साधी राहणी, उच्च विचार ही त्यांची जीवनशैली होती. गावातील सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांनी नेहमी पुढाकार घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्ये यशस्वीरीत्या पूर्ण झाली. त्यामुळे त्यांच्या जाण्याने गावातील एक ज्येष्ठ, समंजस व संयमी व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठीचा दशक्रिया विधी शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कुंबेफळ येथे संपन्न होणार आहे. या प्रसंगी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. राजेंद्र महाराज गाढवे महाराज यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. यातून संत विचार, अध्यात्म व जीवनमूल्यांचे मार्गदर्शन होईल. परिसरातील नागरिकांनी या विधीला उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे.

कै. नारायण काकडे हे आयुष्यभर कुटुंब व समाज यांचा आधारस्तंभ ठरले. त्यांच्या निधनाने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून समस्त गाव त्यांच्या आठवणींनी व्यथित आहे.

शोकाकुल : समस्त काकडे परिवार

## पनवेलकरांसाठी आरोग्य केंद्रात दातांचा दवाखाना असावा ..डॉ. सुरेखा मोहकर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल महानगर पालिकाक्षेत्रातील सर्व आरोग्यकेंद्रात, दवाखान्यात मोफत दातांचा दवाखाना सुरु करण्याची मागणी भाजप मा. नगरसेविका डॉ. सुरेखा वि. मोहोकर यांनी मा. आयुक्त पनवेल महानगरपालिका यांच्याकडे केली. पनवेल महानगर पालिका क्षेत्रात पनवेल महानगर पालिकेमार्फत प्रत्येक प्रभागात आरोग्य केंद्र सुरु आहेत. दररोज अनेक नागरीक आरोग्यसेवेचा लाभ घेण्यासाठी येत असतात. पनवेल महानगरपालिकेत वाढते औदयोगिकरण व यामुळे वाढती लोकसंख्या लक्षात घेता आरोग्य सेवा परिपूर्ण असणे तेव्हढेच महत्वपूर्ण व गरजेचे आहे. याकरीता महानगरपालिके मार्फत नागरिकांच्या सर्व रोगांचे निदान होऊन उपचार होणे गरजेचे आहे. यांस्तव पनवेल महानगर पालिकेच्या सर्व आरोग्यकेंद्र, दवाखाने येथे "मोफत दातांचा दवाखाना" सुरु करण्यात यावा. दंत रोगावर येणारा खर्च हा सर्वसामान्य नागरिक विशेषतः जेष्ठ नागरीक यांच्या आवक्याबाहेरचा असतो.सध्या ओरल कॅन्सर व इतर दातांचे आजार रुग्णाची संख्या झपाट्याने वाढताच आहे.मोफत दंत रोग दवाखान्यामार्फत तंबाखू, पान, गुठखा, सिगारेट इ. पदार्थांच्या सेवणामुळे होणारे आजार यावर नागरिकांना समुपदेशन करून, प्रतिबंधात्मक उपचार करून Oral Cancer,मुखाचे अल्सर व इतर आजरांचे प्रमाण कमी करून National Cancer Control programme मध्ये पनवेल महानगरपालिका मोलाचे सहकार्य करू शकेल.यांस्तव पनवेल महानगर पालिकेच्या प्रत्येक दवाखान्यात, आरोग्य केंद्रात सर्व सोयेसुविधा युक्त "मोफत दातांचा दवाखाना"सुरु करण्याची मागणी नगरसेविका डॉ. सुरेखा व डॉ. श्री. विलास मोहोकर यांनी महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे , मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी यांच्याकडे निवेदनामार्फत केली आहे.



# "साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी" संघटनेचे निवेदन सादर

### उचलले गंभीर व रास्त विषय ; अन्यथा दिला सामुहिक अतिक्रमण करण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** -साकोली येथील "साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी संघटना" काही बाहेरून आलेल्या मुजोर अतिक्रमण धारकांवर चांगलीच संतापली असून यातील विविध मागण्यांचे निवेदन नगरपरिषद मुख्याधिकारी यांना ( गुरू. ११ सप्टें.) ला पदाधिकारी व सदस्यगणांनी स्वाक्षऱ्यांसह सादर केले. या कारवाईची तरतूद सात दिवसांत दखल घ्या, अन्यथा संघटनेतर्फे स्थानिक गोरगरीब गरजूंना धरून शहरात विविध जागी सामुहिक अतिक्रमण करण्याचा इशारा सुद्धा दिला आहे.

गुरुवारी ता. ११ ला प्रशासकीय अधिकारी कल्याणी भवरे यांना हे निवेदन सादर केले. यात नमूद केले आहे की, आम्ही सर्व साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी संघटना आपणास निवेदन सादर करतो की, आमच्या स्थानिक निवासी युवा सुशिक्षित बेरोजगारांना येथे रोजगार करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. जेथे तेथे बाहेरील लोकांनी अतोनात तीन चार ठिकाणी अतिक्रमणे करून जागेवर कब्जा केला आहे. त्यामुळे गावचे गोरगरीब स्थानिक निवासी आजही उपेक्षित वंचित आहेत. करीता खालील मागण्यांची दखल घेऊन सदर मागण्यांवर त्वरीत कारवाई करण्यात येऊन तसा तातडीने निर्णय घ्यावा. यातील प्रमुख मागण्या अश्या की, १) साकोली सेंदूरवाफा नगरपरिषद हद्दीत जे गाळे अतिक्रमणे करून आहेत. त्यात किती गरजू आपले दूकाने लाऊन स्वतःचा व्यवसाय करीत आहेत. त्यांची चौकशी करण्यात यावी. २) साकोली सेंदूरवाफा शहरात किती रूम माफीयांनी खोल्या काढीत गरजूंतर्फे मोठी पगडी घेत त्या खोल्या भाड्याने देऊन केवळ अतिक्रमण करून याचा धंदा व्यवसाय करीत आहेत. त्यांची यादी सादर करण्यात यावी. ३) कुणी कुणी अतिक्रमणे करून आपलीच संपत्ती समजून इतरांना विकण्याचा धंदा केला. त्यांची चौकशी करून अश्यांची यादी सादर करून शासकीय जागेवर खरेदी विक्री प्रकरणी कारवाई करण्यात यावी. ०४) साकोली सेंदूरवाफा शहरात आजपर्यंत कुणी कुणी शासकीय भूखंडावर अतिक्रमणे काढून त्या वहीवाट जागेची विक्री करण्यात आली. किती रूपयांत विक्री केली याची सुद्धा यादी काढून चौकशी करण्यात यावी. व अश्यांवर शासकीय जागेवर गैरव्यवहार प्रकरणी तातडीने दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात यावी. ०५) शहरातील सार्वजनिक सुलभ शौचालय मध्ये लघुशंकेसाठी २ रूपये ही शुल्क रद्द करून विनामुल्य करावे. हे विषय असून सदर वरील मागण्यांवर ०७ (सात) दिवसांत दखल घेण्यात यावी, अन्यथा आमच्या स्थानिक संघटनेतील शेकडो स्थानिक युवा सुशिक्षित बेरोजगार शहरात जेथे जेथे रिकामी जागा दिसणार तेथे तेथे आपले अतिक्रमणे ठोकून त्या सर्व जागेवर a निवेदनात साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी संघटनेचे अध्यक्ष प्रमोद मेश्राम, उपाध्यक्ष इंजि. सपन कापगते, अनिल कापगते, पदाधिकारी अनिल मुरकुटे, चंद्रकांत वडीचार, सहसचिव किशोर बावणे, मार्गदर्शक डी. जी. रंगारी, आशिष चेडगे, महेश पोगळे, निलय झोडे, दिगंबर सुर्यवंशी, कृष्णा बडवाईक, शितल नागदेवे, मेघा बडवाईक, रत्ना खंडारे यांसह शहरातील युवा सुशिक्षित बेरोजगार तरूण यावेळी उपस्थित होते.




# मातंग समाजाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पक्ष कटिबद्ध - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:(आनंद पवार)**

मातंग समाज जागृत होत आहे.सामाजीक आणि राजकीयदृष्या न्याय हक्कासाठी जागृत झालेल्या मातंग सामजाला बळ देण्यासाठी आम्ही मातंग समाजाच्या पाठींशी उभे आहोत. मातंग तरुणानी प्रोफेसर,इंजिनिअर, डॉक्टर,आय ए एस,आय पी एस अशा उच्च शिक्षणामध्ये मोक्याच्या जागा मिळवाव्यात. परदेशातील उच्च शिक्षणाच ही लाभ घ्यावा. त्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या परदेशी विद्यापिठातील शिक्षणासाठी शिष्यवृतीच्या योजना आहेत.त्यांचा लाभ मातंग समाजातील तरुणानी घ्यावा.मातंग समाजाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पक्ष कटिबंध आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शेगाव येथे मातंग समाज मेळाव्यात केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या१०५व्या जयंतीचा समारोप सोहळा आणि मातंग समाज निर्धार मेळाव्याचे शेगाव येथे आयोजन करण्यात आले होते.त्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ना.रामदास आठवले बोलत होते.विचार मंचावर केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातु नितिन अरुण साठे आणि सुषमा साठे,रिपाइ मातंग आघाडी राज्य अध्यक्ष अण्णासाहेब वायदंडे,डॉ.ज.जी मानकर,तसेच माजी आमदार दिलीप सानंदा,रमेश मकासरे,भाऊसाहेब सरदार,संजय बोदडे, ॲड चंद्रकांत बोदडे, शाहीर मधुकर नावकार,अशोक नागदिवे सुनिल अवचार,गजानन कांबळे,संतोष वानखेडे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे जागतिक किर्तीचे साहित्य सम्राट होते.त्यांचे क्रांतिकारी विचार त्यांची लेखणी आज ही जगाला प्रेरणा देणारी आहे.पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर नसुन कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा हा विचार आज ही प्रेरणादायी आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे महाराष्ट्रात भव्य समारक झाले पाहिजे.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य आणि लेखन युग घडवणारे, परिवर्तनवादी, प्रेरणादायी कार्य आहे. त्यामुळे त्यांना मरणोत्तर भारत सरकारचा सर्वोच्च सन्मान भारतरत्न हा किताब दिला पाहिजे. त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत असे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी दिले.यावेळी बुलढाणा जिल्हातील मातंग समाज आणि रिपब्लिकन कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होता.





# पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात 2024-25 साठी 45 कोटी 59 लाख रुपयांचा निधी: दीपक कोळवणकर यांचा खुलासा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,प्रतिनिधी**

दि. ११ सप्टेंबर २०२५ : पनवेल महानगरपालिकेच्या (पीएमसी) आरोग्य विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ४५ कोटी ५९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी स्थानिक नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा, लसीकरण, माता-बाल काळजी आणि वैद्यकीय सुविधांसाठी वापरला जाणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पनवेल महानगरपालिका उपाध्यक्ष दिपक कोळवणकर यांनी या निधीच्या वाटप आणि खर्चाबाबत सविस्तर माहिती जाहीर करत पारदर्शकतेची मागणी केली आहे. त्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत २२ कोटी २४ लाख ८७ हजार रुपये खर्च झाले असून, उर्वरित २३ कोटी ३४ लाख १३ हजार रुपये विविध योजनांसाठी राखीव आहेत. खालीलप्रमाणे तपशील:

**१. निधीचे उपविभाग/प्रकल्पनिहाय वाटप**

दिपक कोळवणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोग्य विभागाचा निधी विविध उपविभागांमध्ये विभागला गेला आहे:

प्राथमिक आरोग्य केंद्रांचे संचालन आणि देखरेख : १५ कोटी रुपये (पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे येथील १५ केंद्रांसाठी).

माता-बाल आरोग्य आणि लसीकरण कार्यक्रम : १० कोटी रुपये (गर्भवती महिलांसाठी योजना आणि टीकाकरण).

उपकरणे आणि इन्फ्रास्ट्रक्चर विकास : १२ कोटी रुपये (नवीन यंत्रसामग्री आणि केंद्र दुरुस्ती).

कर्मचारी वेतन आणि प्रशिक्षण : ५ कोटी रुपये (डॉक्टर, नर्स आणि कर्मचारी).

इतर (आकस्मिक खर्च) : ३ कोटी ५९ लाख रुपये.

कोळवणकर यांनी सांगितले की, हा निधी पीएमसीच्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांद्वारे (सीपीएचसी) १५ लाखांहून अधिक लोकसंख्येला सेवा देण्यासाठी वापरला जात आहे.

२. २२ कोटी २४ लाख ८७ हजार रुपयांचा खर्च: प्रकल्प/काम/बिल तपशील

कोळवणकर यांनी खर्चाचा तपशील उघड केला, जो खालीलप्रमाणे आहे:

आरोग्य केंद्र दुरुस्ती आणि उपकरणे : ८ कोटी ५० लाख रुपये (पनवेल सीपीएचसी-१, कळंबोली सीपीएचसी-४ साठी उपकरणे आणि दुरुस्ती).

लसीकरण आणि शिबिरे : ५ कोटी ७५ लाख रुपये (कोविड-१९ आणि नियमित टीकाकरणासाठी).

कर्मचारी वेतन आणि प्रशिक्षण : ४ कोटी २५ लाख रुपये (५०० कर्मचाऱ्यांचे वेतन आणि प्रशिक्षण).

औषध आणि वैद्यकीय साहित्य : ३ कोटी ७४ लाख ८७ हजार रुपये (मासिक औषध पुरवठा).

कोळवणकर यांनी नमूद केले की, काही बिलांबाबत विलंबामुळे खर्चाचा वेग मंदावला आहे.

३. उर्वरित २३ कोटी ३४ लाख १३ हजार रुपयांचा स्टेटस आणि नियोजित योजना

उर्वरित निधी राखीव असून, डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत खर्च होण्याची अपेक्षा आहे. कोळवणकर यांनी सांगितले की, ८०% निधी नियोजित योजनांसाठी आणि २०% आकस्मिक खर्चासाठी आहे. प्रमुख योजना:

नवीन केंद्रांचा विस्तार : १० कोटी रुपये (कामोठे सेक्टर ३५, तळोजा फेज २).

डिजिटल आरोग्य सुविधा : ५ कोटी रुपये (ई-हेल्थ आणि टेलिमेडिसिन).

विशेष मोहिमा : ५ कोटी ३४ लाख रुपये (मलेरिया, डेंग्यू प्रतिबंध).

**इतर : ३ कोटी रुपये (स्वच्छता कार्यक्रम).**

कोळवणकर यांनी निविदा प्रक्रियेत विलंब आणि पुरवठा साखळीच्या समस्यांवर चिंता व्यक्त केली.

**४. निविदांचे तपशील (कॉन्ट्रॅक्टर, रक्कम, तारीख)**

दीपक कोळवणकर यांनी निविदा प्रक्रियेची माहिती जाहीर केली, जी पीएमसीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे:

मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटल (हिरकणी) : कॉन्ट्रॅक्टर - लार्सन अँड टुब्रो, रक्कम - १५० कोटी रुपये (आरोग्य निधीचा भाग), तारीख - १५ मे २०२४.

उपकरणे खरेदी : कॉन्ट्रॅक्टर - मेडिकल सिस्टम्स इंडिया, रक्कम - २ कोटी ५० लाख रुपये, तारीख - १० जुलै २०२४.

दुरुस्ती कामे : कॉन्ट्रॅक्टर - लोकल बिल्डर्स, रक्कम - १ कोटी २० लाख रुपये, तारीख - २० ऑगस्ट २०२४.

कोळवणकर यांनी पारदर्शक निविदा प्रक्रियेसाठी ई-टेंडर पोर्टलच्या वापरावर भर दिला.

**५. तक्रारी/अनियमिततेची नोंद आणि कारवाई**

कोळवणकर यांनी नमूद केले की, आरोग्य विभागाविरुद्ध १५ तक्रारी नोंदल्या गेल्या, ज्यात निधी दुरुपयोग आणि सुविधा कमतरतेचा समावेश आहे:

निधी दुरुपयोग : ५ तक्रारी, कारवाई - चौकशी सुरू, २ प्रकरणांत ५० लाखांचा दंड.

सुविधा कमतरता : ८ तक्रारी (कामोठे, खारघर येथे डॉक्टरांची कमतरता), कारवाई - कर्मचारी भरती.

निविदा अनियमितता : २ तक्रारी, कारवाई - मुख्याधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला.

कोळवणकर यांनी नागरिकांना तक्रारींसाठी पीएमसी हेल्पलाइन (०२१४२-२६३०००) आणि RTI चा वापर करण्याचे आवाहन केले.

पनवेलमधील आरोग्य केंद्रे आणि दिपक कोळवणकर यांची भूमिका

पीएमसी क्षेत्रात १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे (सीपीएचसी) कार्यरत आहेत, जी पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, तळोजा आणि इतर भागांना सेवा देतात. यादी खालीलप्रमाणे:

सीपीएचसी १ : पनवेल (मुख्य बाजारपेठ).
सीपीएचसी २ : पनवेल (रेल्वे स्टेशन).
सीपीएचसी ३ : नवीन पनवेल.
सीपीएचसी ४ : कळंबोली (सेक्टर १-५).
सीपीएचसी ५ : खारघर (सेक्टर १२).
सीपीएचसी ६ : कामोठे.
सीपीएचसी ७ : काळुंद्रे/भिंगरी.
सीपीएचसी ८ : कळंबोली गाव.
सीपीएचसी ९ : पाले खुर्द.
सीपीएचसी १० : रोहिंजण.
सीपीएचसी ११ : खांदा कॉलनी.
सीपीएचसी १२ : तळोजा फेज २.
सीपीएचसी १३ : कळंबोली सेक्टर २०.
सीपीएचसी १४ : कामोठे सेक्टर २२.
सीपीएचसी १५ : कामोठे सेक्टर ३५.

दीपक कोळवणकर यांनी या केंद्रांच्या सुधारणेसाठी आणि निधीच्या पारदर्शक वापरासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांनी सांगितले, “आम्ही महाराष्ट्र सैनिक गटामार्फत नागरिकांच्या आरोग्य हक्कांसाठी लढत आहोत. निधीचा प्रत्येक पैसा योग्य ठिकाणी वापरला जावा, यासाठी आमचा प्रयत्न आहे.”

**नागरिकांचे आवाहन**

कोळवणकर यांनी नागरिकांना निधीच्या वापराबाबत माहिती घेण्यासाठी पीएमसीच्या वेबसाइट (panvelcorporation.com) आणि हेल्पलाइनचा वापर करण्यास सांगितले. “पारदर्शकता आणि जबाबदारी ही आमची मागणी आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा,” असे त्यांचे आवाहन आहे. अधिक माहितीसाठी दिपक कोळवणकर यांच्याशी व्हाट्सअप (9892080050) वर संपर्क साधता येईल.

# अखिल भारतीय केंद्रीय सेवानिवृत्त पेन्शनर संघटनेची द्विवार्षिक सभा संपन्न.

## (अध्यक्ष, आर.एम.एच.शेख तर सचिव, अनिल बालपांडे यांची नियुक्ती)

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ सचिव प्रतिनिधी**

ऑल इंडिया सेंट्रल गव्हर्नमेंट पेन्शनर असोसिएशन ही संस्था पब्लिक ट्रस्ट अंतर्गत रजिस्टर असून याचे मुख्यालय पुणे येथे आहे. देशभरात 44 शाखा असलेल्या या असोसिएशन च्या नागपूर शाखेची 21वी द्विवार्षिक सभा संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने देवी अहिल्या मंदिर सभागृह, साठे मार्ग, धंतोली, नागपूर येथे दिनांक 07 सप्टेंबर 2025 ला संपन्न झाली. अध्यक्ष, आर.एम.एच. शेख यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झालेल्या या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून जनरल सेक्रेटरी, एच.एफ.चौधरी तसेच सहाय्यक जनरल सेक्रेटरी, मनोहर पत्की आणि संघटनेचे सचिव, गंगाधर नेरकर उपस्थित होते. दीप प्रज्वलानंतर "इतनी शक्ती हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर होना" ही प्रार्थना घेण्यात आली. अध्यक्षांच्या स्वागत पर प्रास्ताविका नंतर पाहुण्यांची ओळख व त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर दिवंगत सभासद तसेच ज्ञात अज्ञात मान्यवरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थेचे सचिव, गंगाधर नेरकर यांनी 2023 च्या सभेचा वृत्तांत वाचून दाखविला. खजिनदार, राजेंद्र खुळे द्वारा 23- 24 व 24-25 च्या जमाखर्चाचे वाचन करून सभेची संमती घेण्यात आली. ज्याही सभासदांची वयाची 75 वर्षे पूर्ण झालीत अशा मान्यवरांना यावेळी शाल, श्रीफळ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. पेन्शनर्स यांना येत असलेल्या विविध अडचणीवर तोडगा काढण्यासाठी मांडलेले



प्रस्ताव पुढील कार्यवाही साठी उच्च स्तरावर सादर करावेत अशी विनंती देखील यावेळी करण्यात आली. जनरल सेक्रेटरी, एच. एफ. चौधरी यांनी आपल्या मार्गदर्शनपर संबोधनात नोंशनल इन्क्रिमेंट, पेन्शन बाबत, सीजीएचएस बद्दल अशा अनेक विषयांवर अपडेट दिलेत. आणि उपस्थित पेन्शनरच्या विचारलेल्या शंकांचे समाधान केले. दि. 12 ऑक्टोबर 2025 ला नाशिक येथे होऊ घातलेल्या खुल्या अधिवेशनात सहभागी होण्याचेही आव्हाहन त्यांनी यावेळी केले. ज्यामध्ये आठवा वेतन आयोग, मेडिकल भत्यात वाढ, कमुटेड पेन्शनची पुनर्स्थापना (15 वर्षा ऐवजी 12 वर्ष ),बीएसएनएल/एमटीएनएल च्या 2017 पासूनचे पेन्शन रिविजन बाबत सविस्तर चर्चासत्र होईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. तदनंतर नागपूर शाखेच्या 2025 ते 2027 साला साठी निवड झालेल्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली ज्यामध्ये अध्यक्ष, आर.एम.एच.शेख उपाध्यक्ष, पी.पी जयस्वाल, आर.डब्ल्यू.हुकरे ,गंगाधर नेरकर, सुभाष गुजर, सचिव, अनिल बालपांडे, सहसचिव, अशोक पाचपोर, पांडुरंग गायकवाड, खजिनदार, राजेंद्र खुळे, संघटन सचिव, मनोहर पांडे, एम.व्ही. डोलारे, शरद नखाते, संजीव शेळके, दिलीप अंजीकर, तुळशीराम वाटगुरे, कार्यकारणी सदस्य, एम. एस. भारद्वाज, डी. एस. किल्लेदार, एम. झेड. जुनघरे, कृष्णराव पौणीकर यांचा समावेश आहे. आभार प्रदर्शन गंगाधर नेरकर यांनी केले. तर सूत्रसंचालन, अनिल बालपांडे यांचे होते. राष्ट्रगीता नंतर स्नेहभोजनाने सभेची सांगता झाली.

# वीज क्षेत्रातील कामगिरीत महावितरणचा प्रथम क्रमांक

## केंद्र सरकारच्या मानांकनात यश, 100 पैकी 93 गुण

**सतीश कडू संपादक**
**नागपूर विभाग दैनिक युवक आधार**

नागपूर/ मुंबई, दि. 11 सप्टेंबर 2025: केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने निश्चित केलेल्या मानांकनामध्ये शंभरपैकी ९३ गुण मिळवून महावितरणने प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या कामगिरीमुळे कंपनीला यश मिळाले आहे. या यशाबद्दल आपण मा. मुख्यमंत्र्याचे आभार मानतो तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो, असे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

महावितरणच्या कामगिरीत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले, असे ते म्हणाले. ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आरईसी व पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी वीज कंपन्यांचे मानांकन निश्चित केले. पश्चिम भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण 100 पैकी93 गुणांसह महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे व राज्याला ए मानांकन मिळाले आहे. महाराष्ट्राच्या पाठोपाठ मध्य प्रदेश (84.5 गुण), गोवा (74 गुण), दादरा, नगर हवेली आणि दीव दमण (74 गुण), गुजरात (67 गुण) व छत्तीसगड (52 गुण) यांचा क्रमांक लागतो.

मानांकन निश्चित करण्यासाठी पाच निकष ठरविण्यात आले होते. त्यापैकी संसाधन पर्याप्तता (32 पैकी 32 गुण), ऊर्जा परिवर्तन (15 पैकी 15 गुण) व नियामकाच्या अनुषंगाने प्रशासन (5 पैकी 5) या तीन घटकात महावितरणला पैकीच्या पैकी गुण मिळाले. वीज कंपनीचे आर्थिक स्थैर्य या घटकात 25 पैकी 24 गुण मिळाले. जीवन सुलभता व व्यवसाय सुलभता या निकषात महावितरणला 23 पैकी 17 गुण मिळाले. या निकषात गुजरातला 14 तर मध्य प्रदेशला 16 गुण मिळाले.

वीज क्षेत्रातील कामगिरीबद्दल गुणांकनाची प्रक्रिया 3 मार्च रोजी सुरू झाली होती. देशातील मानांकनामध्ये 85 पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या राज्यांचा ए गटात समावेश केला असून त्यामध्ये महाराष्ट्रासह एकूण 8 राज्ये आहेत.

महावितरणच्या यशाचे कारण

महावितरणने गेल्या तीन वर्षात ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी तसेच भविष्यकाळाचा वेध घेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली. त्यामुळे मानांकन उंचावले आहे.

आगामी काळात राज्याची विजेची मागणी किती असेल याचा अभ्यास करून महावितरणने ऊर्जा विभागाच्या मदतीने आराखडा तयार केला. अशा प्रकारे ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार महावितरणने गेल्या अडीच वर्षात 45,000 मेगावॅट वीज खरेदीसाठीचे करार केले व आगामी पाच वर्षांची तरतूद केली. या वीज खरेदी करारांमध्ये नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात वीज खरेदीचे 66 हजार कोटी रुपये वाचणार असून त्याच्या आधारे महावितरणच्या वीजदरात पाच वर्षांसाठी सर्वच ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा 16 हजार मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महावितरणच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. राज्याच्या ऊर्जा परिवर्तनासाठी हा महत्त्वाचा गेम चेंजर प्रकल्प आहे. शेतांमध्ये सौर पंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. वीज पुरवठ्याचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी महावितरणतर्फे आरडीएसएस योजनेच्या अंतर्गत पायाभूत सुविधांचे काम प्रभावीपणे चालू आहे. या सर्वांचा विशेषतः वीजदराच्या कपातीत मिळालेल्या यशाचा परिणाम म्हणून महावितरणला 100 पैकी 93 गुण मिळाले असून प्रथम क्रमांक मिळाला आहे

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**महावितरण, नागपूर**

# रोशणगावची शाळा मोडकळीस, शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात”

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत धोकादायक स्थितीत असून, ती कोणत्याही क्षणी कोसळू शकते. तरीदेखील या इमारतीत दररोज विद्यार्थी , विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. ही बाब विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून, पालक वर्ग व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शाळेची इमारत सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधली गेली होती या कालावधीत इमारतीची कोणतीही मोठी दुरुस्ती किंवा नुतनीकरण करण्यात आलेले नाही त्यामुळे सध्या भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून, छताच्या लोखंडी सळ्या बाहेर पडल्या आहेत. पावसाळ्याच्या दिवसात छत गळते, वर्गात पाणी साचते आणि विद्युत साहित्यही धोकादायक अवस्थेत आहे. पावसाळ्यात




पाणी गळतीमुळे वर्गामध्ये शिकणे अशक्य होते काही भागांत छताचे लाकूड व लोखंडाचे सळईही गंजून गळण्याच्या स्थितीत आहेत. विद्यार्थ्यांवर जीव मुठीत घेऊन शिक्षणाची वेळ विद्यार्थ्यांना दररोज अशा मोडकळीस आलेल्या इमारतीत बसवले जाते वर्ग खोल्यांतील छत कधीही कोसळू शकते, असा धोका असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. काही पालकांनी आपली मुले शाळेत पाठवणे थांबवले असून, अनेक जण भीतीच्या छायेखाली आहेत.

स्थानिक नागरिक, शिक्षक संघटना, तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करून नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे अन्यथा पालक व नागरिकांनी मोठ्या आंदोलनाचा नियोजनात असल्याचे सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, युवा नेते साईनाथ पाटील जाधव यांनी सांगितले आहे. तसेच शाळा म्हणजे शिक्षणाचं मंदिर असतं, पण आमच्या मुलांसाठी ते मृत्यूचं दार ठरतंय. प्रशासन काही हालचाल करत नाही, ही फार दुःखद बाब आहे. हे विद्यार्थ्यांच्या पालकाचे दुःखद शब्द आहेत.

# गुरुकुल एज्युकेशन कल्चरल ट्रस्ट तर्फे दुबई

## मध्ये पुरस्कार सोहळा, रंगला पहिला आंतरराष्ट्रीय धर्मादाय कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवीन पनवेल येथील गुरुकुल शैक्षणिक आणि सांस्कृतिक ट्रस्ट तर्फे दुबई येथे पहिला आंतरराष्ट्रीय धर्मादाय कार्यक्रम 2025 आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुरस्कार सोहळा देखील रंगला.

सात सप्टेंबर रोजी श्री श्री शंकर स्वामी जी (मणीकेश महासंस्थानम तेलंगणाचे संस्थापक) यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संस्कृती आणि भारतीय अध्यात्माची शक्ती साजरी करण्यासाठी दुबई येथे पहिला आंतरराष्ट्रीय धर्मादाय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जागतिक अर्थव्यवस्था आणि भारतीयांच्या विकासासाठी अष्टलक्ष्मी पूजा करण्यात आली. गुरुकुल शैक्षणिक आणि सांस्कृतिक ट्रस्टचे अध्यक्ष पद्मा सराफ, अंजनी सराफ, निलेश शेट्टी यांनी दुबईच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याने भारताला पुन्हा एकदा विश्वगुरू म्हणून सिद्ध केले. भारतातील संजीवनी मालवणकर, मास्टर युसुफ, डॉक्टर मंजुला दासगुप्ता, गुरुरुपा किरण यांना विशेष क्षेत्रासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान अनेक भारतीय सांस्कृतिक कार्यक्रमांचे दर्शन घडले.




यावेळी अनंत सराफ, लक्ष्मी सराफ, शनल जैन, सिताराम शेट्टी, अशोक शेट्टी पद्मा सराफ, अंजनी सराफ, संजीवनी मालवणकर, श्री श्री शंकर स्वामी, युसूफ हुसेन, निलेश शेट्टी, गुरुरूपा किरण,श्री सर्वोत्तम शेट्टी, कॅप्टन पंकज अनिल, मिस्टर फिरास, सिताराम शेट्टी, अशोक शेट्टी यांचे सहकार्य लाभले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# विवाहा पूर्वी केले वृक्षारोपण परिसरातून नवदांपत्यावर कौतुकांचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**
**मिरजगाव प्रतिनिधी सतीश शिंदे**



मिरजगाव येथे एका आगळ्या वेगळ्या विवाह सोहळ्याची चर्चा सध्या सर्वत्र चर्चिली जात आहे. मिरजगाव येथील ज्येष्ठ पत्रकार किशोर आखाडे यांचा मुलगा ऋषिकेश व विकास राऊत यांची कन्या व इंदापूर येथील ग्रामसेवक संजय यादव यांची भाची विद्या यांचा शुभविवाह वेगळेपणा जपत पार पाडला लग्नपूर्वी साखरपुडा सोहळा होण्याअगोदर वृक्षारोपण करून पर्यावरणाची शपथ घेऊन मंगल कार्यालयाच्या परिसरातच वधू-वरांच्या हस्ते आंब्याच्या झाडाचे कसलाही गाजावाजा न करता रोपण केले गेले तसेच सफाई करणाऱ्या व घरकाम करणाऱ्या दोन महिलांना साडी चोळीचा मान देत त्यांचा सन्मान करत सामाजिक बांधिलकी जपली पर्यावरण रक्षणासाठी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश समाजात रुचवण्याचा निश्चय महादेव आखाडे व राऊत आणि आखाडे कुटुंबियांनी केला असल्याने विवाहास उपस्थित असलेले आष्टी पाटोदा मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याण आखाडे अहिल्यानगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा खासदार निलेश लंके यांच्या सौभाग्यवती राणी लंके भाजपा नेते अंबादास पिसाळ तसेच सरपंच नितीन खेतमाळीस. संपतराव बावडकर सर आदींसह, सामाजिक शैक्षणिक राजकीय व्यावसायिक शेतकरी असे अनेक क्षेत्रातील मान्यवर या विवाह सोहळ्यास उपस्थित होते सर्व मान्यवरांनी दोन्ही परिवाराचे वृक्षारोपण केल्याबद्दल अभिनंदन केले.

# प्रतिष्ठित सवाई गंधर्व महोत्सवात रायगड नवी मुंबईला मानाचे पान

## जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी एकाच व्यासपीठावर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**







पं. सवाई गंधर्व यांच्या ७३ व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्नाटक सरकारच्या कन्नड आणि सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कुंदगोळ येथिल 'संगीत महोत्सवा'त रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना शास्त्रीय गायनासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विद्वान द्वारकिश एम., पं. गणपती भट यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी यांना एकाच व्यासपीठावर गायनाची संधी मिळाली आहे. त्यामुळे रायगड-नवी मुंबईला या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित महोत्सवात मानाचे पान लाभले आहे.

हा महोत्सव दिनांक १५ व १६ सप्टेंबर रोजी कर्नाटकमधील संगीत सम्राट सवाई गंधर्व स्मारक भवन येथे होणार असून, देशभरातील नामवंत गायक-वादकांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.या संगीत महोत्सवाचे उद्घाटन १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महास्वामीगलू, जगद्गुरू फकीर सिद्धाराम महास्वामीगलू यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी कर्नाटक राज्याचे ग्राहक संरक्षण व अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद शिंदे, आमदार एम. आर. पाटील, पत्तन पंचायत अध्यक्ष श्यामसुंदर देसाई, कन्नड आणि सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक संचालक एम. एस. बेक्केरी यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच सवाई गंधर्व स्मारक विश्वस्त संस्थेचे चेअरमन पद्मश्री डॉ. अरविंद काटगी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे. या महोत्सवात पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे यांना 'सवाई गंधर्व राष्ट्रीय संगीत पुरस्कार' ने सन्मानित करण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर रोजी पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विदुषी पद्मिनी राव, पं. उमेश चौधरी, पं. क्रिशनेंद्र वाडीकर, पं. रतन शर्मा, पं. अभिषेक जोशी, श्रीकांत देवी व राजेश्वरी पाटील यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे. तसेच विद्वान द्वारकिश एम. व पं. आनंद पाटील यांची कर्नाटकी वीणा-गायन जुगलबंदी आणि हेमंत जोशी यांचे तबलावादन होणार आहे. १६ सप्टेंबर रोजी पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पं. गणपती भट, अशोक नाडगीर, वीणा हंगल यांच्यासह अनेक मान्यवर गायक आपले सादरीकरण करणार आहेत. रायगड-नवी मुंबईचे सुपुत्र, रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना प्रतिष्ठित सवाई गंधर्व संगीत महोत्सवात शास्त्रीय गायनाची संधी मिळणे हा खरोखरच मोठा सन्मान आहे. पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पं. गणपती भट यांसारख्या जागतिक कीर्तीच्या दिग्गज कलाकारांच्या बरोबरीने एकाच मंचावर सादरीकरण करण्याची ही संधी केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर रायगड-नवी मुंबईसाठीही मानाचा क्षण आहे.

# श्री साखर चौथ मित्र मंडळ श्रीवर्धन दांडा येथे चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन प्रतिनिधी**

श्रीवर्धन दांडा, पाच रस्ता येथील श्री साखर चौथ मित्र मंडळ आयोजित गणेशोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेला मुलांकडून आणि प्रौढांकडून प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तब्बल ५५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे घोषित करण्यात आले –

पहिला गट : प्रथम क्रमांक – कु. सौम्या अनिकेत मोहित, द्वितीय क्रमांक – कु. तनुष्का तेजस मोहित

दुसरा गट : प्रथम क्रमांक – कु. दुर्वा मिलिंद भाटकर, द्वितीय क्रमांक – कु. श्रीशा उदय मांजरेकर

खुला गट : प्रथम क्रमांक – श्री. प्रशांत प्रभाकर पोलेकर, द्वितीय क्रमांक – सौ. कावेरी मनोज उग्रेजिया

गणेशोत्सवात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवण्याची परंपरा या मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून कायम राखली आहे. यंदाही चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून मंडळाने उत्सवाला वेगळी रंगत आणली.

या यशस्वी आयोजनाबद्दल बोलताना मंडळाचे अध्यक्ष श्री. भावेश विश्वनाथ मांजरेकर यांनी सांगितले की, "गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रमांद्वारे आम्ही समाजाशी नाते जोडले आहे. यावर्षीदेखील मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद प्रेरणादायी आहे आणि पुढेही हाच उत्साह कायम ठेवत आम्ही गणेशोत्सव साजरा करू."

साखर चौथ मित्र मंडळाने राबवलेला हा उपक्रम केवळ स्पर्धा न राहता, लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांना सर्जनशीलतेची आणि गणेशभक्तीची प्रेरणा देणारा ठरला आहे.










# मुख्यध्यापक संदेश आमगे यांच्या कार्यकाळात लोकसहभागातून डिजीटल शाळेसाठी जमा केलेल्या पैशाचा हिशोबच गायब

## किचन शेडसाठी आलेला निधी कागदोपत्रीच

**दैनिक युवक आधार**
**देगलूर प्रतिनिधी**

दि.१२) मौजे हणेगाव येथील जिल्हा परिषद शाळा ही देगलूर तालूक्यात एक नंबरची शाळा म्हणून नावाजलेली होती,परंतू अशा मुख्याध्यापकामुळे जिल्हा परिषद शाळा संपुष्टात येत आहे.अशा मुख्याध्यापकांना शाळेतील विद्यार्थी कमी होत असल्याची चिंता नसून निधी किती येतो व त्याची विल्हेवाट कशी लावायची याचीच चिंता असते. अशा प्रकाराची दखल घेत दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी माहितीच्या अधिकाराखाली जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय हणेगाव येथील मुख्याध्यापक संदेश आमगे यांच्या इ.स.२०२३-२०२४-२०२५ च्या कार्यकाळात लोक सहभागातून केलेल्या डिजीटल शाळेच्या जमाखर्चाचा हिशोब न देणे?किचन शेडच्या चुकीच्या कामाचा जमाखर्चाचा हिशोब देणे?अशा अनेक चुकीच्या कामाविषयी चुकीचे बिले उचलून शाळेचा एक प्रकारे नुकसान केल्यामुळे शाळेचा विकास खुंटला असून तसेच शाळेच्या रंगरंगोटीसाठी हणेगाव येथे कलर मिळू शकतो तर स्टेशनरी बिले उदगीर व अन्य ठिकाणाहून का? अशा सर्व कामाची दोन दिवसात चौकशी व्हावी अन्यथा उपोषण करण्यात येईल.असे निवेदन माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष महादेव उप्पे व सहसचिव प्रेसनजित कांबळे दावणगीर यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिले.

# अनसिंग पोलीस स्टेशन येथे गणपती विसर्जना बाबत थाटात महाप्रसाद.!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / वाशिम**
**गजानन पवार पाटील**



अनसिंग:-गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनसिंग पोलीस स्टेशन गणपती मंडळाच्या वतीने आयोजित महाप्रसाद कार्यक्रम 10 सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सकाळपासून भाविकांची गर्दी पाहायला मिळाली गणपती बाप्पाची आरती करण्यात आली. तसेच भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी गावातील प्रतिष्ठित नागरिक मान्यवर तसेच महिला युवक व लहानग्या मुलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. तसेच वाशिम जिल्हा प्रतिनिधी Tv 24 Live गजानन पवार पाटील. हे सुद्धा उपस्थित होते. धार्मिक वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमामुळे भाविकांमध्ये श्रद्धा व भक्तीची भावना अधिक दृढ झाल्याचे जाणवले गावातील नागरिकांनी पोलीस स्टेशन गणपती मंडळाचे या उपक्रमाचे कौतुक केले असून सामाजिक ऐक्य व भक्तीभाव याचा सुंदर संगम या कार्यक्रमातून दिसून आला.

# पिंपळगाव बसवंत शेतकऱ्यांवर केलेल्या मारहाणी प्रकरणी तात्काळ कार्यवाही करावी मा. आमदार अनिल अण्णा कदम

***दैनिक: युवक आधार /कृष्णा गायकवाड- पिंपळगाव बसवंत***



*रेहमान आडत यांच्याकडून शेतकऱ्यांवर झालेल्या मारहाण प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी*

पिंपळगाव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समिती पिंपळगाव बसवंत तालुका निफाड येथील रेहमान आडत यांनी नैताळे येथील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्याला अडत्याकडून जीव घेणी मारहाण करून गंभीर दुखापत करण्यात आल्याची घटना पिंपळगाव बसवंत येथे घडलेली आहे ही घटना अतिशय निंदनीय व चिंताजनक असल्याने या घटनेमुळे शेतकरी बांधवांमध्ये प्रचंड असंतोष व भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आडत्याकडून शेतकऱ्यांची सतत पिळवणूक होत असून त्यांना योग्य भाव नाकारला जात आहे तसेच योग्य वागणूक भेटत नसल्याने वेळोवेळी घडणाऱ्या अशा घटनांमुळे पिंपळगाव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून शेतकरी हिताला बाधा पोहोचत आहे.

त्यामुळे संबंधित अडत्यावर तात्काळ कारवाई करून त्याचा परवाना रद्द करण्यात यावा,शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी कडक उपाययोजना कराव्यात,अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पातळीवर विशेष देखरेख ठेवावी,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती / सचिव यांनी तात्काळ सदर आडत्या विरोधात पोलीस कार्यवाही करावी शेतकरी बांधवांचा विश्वास टिकवण्यासाठी व त्यांच्या हित संरक्षणासाठी या प्रकरणात तात्काळ व ठोस कार्यवाही करणे आवश्यक आहे.

पिंपळगाव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समिती चे सदस्य मा.आमदार अनिल अण्णा कदम याच बरोबर कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य श्री गोकुळ बबनराव गीते व श्री राजेश चंद्रकांत पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य यांनी व्यक्त केले आहे.

# सिल्लोड शहरात जुन्या दारुचा साठा नविन दराने विक्री, ग्राहकांमध्ये संताप

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



सिल्लोड :- महाराष्ट्र ABC मधील नवीन उत्पादन शुल्क धोरणामुळे जुन्या दारूचा साठा नविन दरात विकणे शक्य नाही. महाराष्ट्र सरकारने उत्पादन शुल्क आणि नियमांमधील बदलांना मंजुरी दिल्यानंतर भारतीय बनावटीच्या विदेशी दारू आणि देशी दारूवरील उत्पादन शुल्कात वाढ झाली आहे.ज्यामुळे दारूच्या किंमती वाढल्या आहे.या वाढीचा फायदा घेऊन सिल्लोड शहरातील काही दारू विक्रेते जुन्या दारुचा साठा नविन दराने विक्री करत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.

शहरातील दारू दुकानांवर सर्रास जुन्या दारूचा स्टॉक नवीन दरात विकला जात आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खुलेआम सुरू असलेला हा प्रकार जबाबदार दारूबंदी अधिकाऱ्यांना कसा दिसत नाही ? असा संतप्त सवाल ग्राहकांकडून विचारला जात आहे.

राज्य सरकारने मागील महिन्यात राज्यभरात विविध दारूचे भाव वाढवले. शहरातील दारू विक्रेत्यांनी जुन्या दरातील दारूचा मोठ्या प्रमाणात स्टॉक करून ठेवला होता. तो आता वाढीव दराने विकला जात आहे. याबाबत अनेक ग्राहकांनी आक्षेप घेतला, तर संबंधित दारू विक्रेते त्यांना हुसकावून लावतात. खुल्या दारू विक्रेत्यांकडून ग्राहकांची होत असलेली ही लुबाडणूक दारूबंदी विभागाचे अधिकारी थांबवतील का? व त्यांच्या कारवाई करतील का असा संतप्त सवाल ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.

# सामाजिक कार्यकर्ते योगी भाऊ प्रधान यांचा वाढदिवस केला विविध सामाजिक उपक्रमाने साजरा...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**



परतूर येथील दलीत चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते योगीभाऊ प्रधान यांनी त्यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा केला आहे. योगी भाऊ प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या मध्ये ब्लड प्रेशर, मधुमेह, किडनीचे आजार, हृदय विकार, दमा यासारख्या आजाराच्या तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्या परतुर येथील सुप्रसिद्ध डॉ. ज्ञानेश्वर अरुण शिंदे डॉ. निकिता ज्ञानेश्वर शिंदे, डॉ. श्रुती जाधव व डॉ.कुलदीप सरकटे यांनी केल्या आणि उपचार देखील केले तसेच लक्ष्मी गंगा गोशाळा येथे चारा वाटप, स्नेहांकुर अनाथ आश्रम येथील मुलांना शालेय साहित्य वाटप व किराणा वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन कौशल्यबाई दादाराव प्रधान यांनी केले तर सूत्रसंचालन बौद्धचार्य हेमंत पहाडे यांनी केले. यावेळी सागर अवसरमोल, दीपक कादे, कपिल आखाडे, अविनाश पाडेवार, सुशील वाघमारे,शिवराज सोनटक्के, पत्रकार राजाभाऊ भदर्गे यांची उपस्थिती होती.

# जनसुरक्षा विधेयक विरोधात संघर्ष समिती ठाणे जिल्ह्यातर्फे विधायक रद्द करण्याच्या घोषणा.

**दैनिक युवक आधार**
**, रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

दि.१२, ठाणे : महाराष्ट्र विधीमंडळात पाशवी बहुमताच्या जोरावर "महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ " मंजूर करण्यात आले.सरकारने नक्षलवादाचा बहाणा करून हा कायदा आणला असला,तरी या कायद्यामध्ये " नक्षलवाद "हा शब्द नाही.प्रत्यक्षात हा कायदा सरकारला विरोध करणाऱ्या, सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्या आणि शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर गदा आणण्यासाठी तयार केला आहे.हाच कायदा १९२२ साली ब्रिटिशांनी हा कायदा आणून भारतीय नागरिकांना नाहक त्रास दिला. त्यांच्या विरोध म्हणून पंडित जवाहरलाला नेहरू,महात्मा गांधी यांनी पुढाकार घेऊन १९४२ साली हा कायदा रद्द करून घेतला कारण लोकांनी लोकांसाठी तयार केलेले लोकशाही हवी होती म्हणून महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक सरकारने मागे घ्यावे आणि दोन्ही सभागृहात पारित झालेल्या या विधेयकावर राज्यपालांनी सही करू नये,संविधानिक व लोकशाही अधिकारांचा सन्मान राखावा,शांततामय आंदोलन व सरकारवरील टीकेवर निर्बंध त्वरित थांबवावेत या प्रमुख मागण्यासाठी जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्ह्यातील विविध संस्था संघटना आणि महाविकास आघाडीतील पक्ष संघटनाच्या वतीने दिनांक १० सप्टेंबर रोजी दु.३.३० वा.भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णकृत पुतळ्याजवळ ठाणे स्टेशन प.येथे निदर्शने करण्यात आली.महाराष्ट्र विधिमंडळाने नुकतेच जनसुरक्षा विधेयक २०२४ मंजूर केले आहे. या विधेयकाला विविध नागरिक संघटनांनी व राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांनी विरोध दर्शवून चिंता व्यक्त केली आहे.दि.१० व ११ जुलै २०२५ रोजी विधिमंडळात मंजूर झालेल्या या विधेयकाची सखोल समिक्षा करण्यासाठी मार्च २०२५ मध्ये महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अध्यक्षतेखाली २६ सदस्यीय संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती.या समितीने जनतेकडून सदर विधेयकावर हरकती व सूचना मागविल्या होत्या. समितीमध्ये एकूण १२७५० हरकती व सूचना प्राप्त झाल्या.त्यापैकी ९५०० पेक्षा जास्त हरकती सदर विधेयक रद्द करा.या बाजूच्या होत्या यावरून राज्यातील जनता या विधेयकाच्या विरोधात आहे हे स्पष्ट




आहे.या पूर्वी कोणत्याही विधेयकावर इतक्या मोठ्या प्रमाणावर कधीच हरकती नोंदविल्या गेल्या नव्हत्या. तरीही सरकारने या हरकतीकडे दुर्लक्ष करून कायदा पुढे रेटला. मात्र,समितीकडे प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांची राज्य सरकारने कोणतीही दखल घेतली नाही. या विधेयकातील तरतुदी पाहता शहरी नक्षलवादाच्या नावाखाली संविधानिक मार्गाने चालणारी आंदोलने दडपून टाकण्याचे अमर्याद अधिकार सरकारला प्राप्त होणार आहे.या विधेयकाद्वारे राज्य सरकार जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापन करण्याचा अधिकार, सरकारच्या जनविरोधी धोरणाला विरोध करण्याचा अधिकार,नागरिकांच्या हक्कावर घाला घालण्याचे काम करीत आहे.त्यात सरकारी धोरणावर टीका करणेही गुन्हा ठरेल.शांततामय आंदोलन, मोर्चा,उपोषण,धरणे,सत्याग्रह,संप हे बेकायदा घोषित होतील,पोलीसांना घरात घुसून तपास,जप्ती करण्याचे अमर्याद अधिकार दिले जाईल,एखादी संघटना बेकायदेशीर ठरली की,तिची मालमत्ता, निधी जप्त केली जाईल,फक्त संघटनेचा सदस्य असणे,वर्गणी देणे,मदत करणे, यासाठीही २ ते ७ वर्ष तुरुंगवास व लाखोंचा दंड होऊ शकतो इ.घटनात्मक हक्कांवर मर्यादा आणण्याचा प्रयत्न करीत आहे.लोकशाही व्यवस्थेत सरकारवर टीका करणे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे आणि न्याय मिळवण्यासाठी अन्यायाच्या विरुद्ध संघटित होणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क आहे. परंतू,या विधेयकातील घटनाबाह्य तरतुदीमुळे राज्यातील निरापराध नागरिकांवर कारवाई होण्याची भीती निर्माण झाली आहे.या विधेयकातील अनेक तरतुदी संविधानिक मूल्याची अवहेलना करणाऱ्या आहेत. ज्या बाबी करिता राज्य सरकार हा कायदा करू पाहत आहे.त्या शहरातील नक्षलवाद व बेकायदेशीर कृत्ये यांची परिभाषा या विधेयकात सुस्पष्ट नाही.या कायद्यामुळे नागरिकांना शेतकरी,कामगार,महिला, विद्यार्थी,पर्यावरण रक्षण,भ्रष्टाचारा विरोधात,लढणारे सर्वजण या कायद्याच्या फेऱ्यात येतील ठाणे,रायगड,गडचिरोली, पालघर,मुंबईसह राज्यभरातील प्रकल्पाविरोधात बोलणे बेकायदेशीर ठरेल.भाषिक,सांस्कृतिक प्रश्नांवर आवाज उठविणेही गुन्हा ठरेल,एखादी संघटना बेकायदेशीर घोषित झाली की,तिचे सर्व सदस्य तुरुंगात जाऊ शकतात अशा अनेक कायदे नागरिकांवर लादण्याचे काम सरकार करीत आहे.सर्व प्रकारच्या दहशतवादी नक्षलवादी कृत्यांना आळा बसलाच पाहिजे. याबाबतीत कोणाचे दुमत नाही.परंतू,Unlawful Activities Prevention Act (UAPA ), Maharashtra Control Of Orgarnise Crime Act (MCO-CA) Bhartiya Nyaya Sanhita (B.N.S.)सारखे कायदे अस्तित्वात असताना,त्याच प्रकारच्या आणखी एका विशेष कायद्याची आवश्यकता नाही.असे आमचे मत आहे.जनतेच्या सुरक्षेच्या नावाखाली अशा कठोर उपाययोजना लादल्यास समाजात भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.लोकशाही व्यवस्था खुल्या संवादावर,पारदर्शकतेवर आणि विश्वासावर आधारित असते त्यामुळे कोणतेही विधेयक जे नागरिकांचे अधिकार कमी करते,त्यावर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे.म्हणून नागरिकांच्या संवैधानिक अधिकाराची पायमल्ली करणारे हे घटनाबाह्य विधेयक रद्द करावे. सदर आंदोलनामध्ये महाविकास आघाडीतील भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)पक्ष,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष,शिवसेना(उबाठा), यांच्या सह जनआंदोलनाचा राष्ट्रीय smnvy,भारत जोडो अभियान,श्रमिक मुक्ती दल,शोषित जनआंदोलन,श्रमिक जनता संघ,एम.एस.इ.बी कर्मचारी संघटना,भारतीय महिला फेडरेशन,घर कामगार संघटना आदी विविध संस्था संघटनाचे कार्यकर्ते सभाही झाले होते. भारतीय महिला फेडरेशनचे सदस्य निर्मला पवार,भारत जोडो अभियानचे राजेंद्र चव्हाण,जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वय अजय भोसले,राष्ट्रसेवा दलाचे उद्य चौधरी, अनुबंध संस्थेचे मीनल सोहनी,सूर्यकांत कोळी,विशाल जाधव,प्रभाकर घुले,इंदवी तळपुदे,महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे पुष्पा तापोळे,अजित डफळे, ओसामा रावल,अन्न पुरवठा समितीचे मुक्ता श्रीवास्तव,श्रमिक जनता संघाचे महासचिव जगदीश खैरालिया,संघटक गणेश चव्हाण,सुभाष खाणेकर, नरसिभाई झाला,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे लिलेश्वर बनसोड,अड.रवींद्र मोरे, भास्कर गव्हाळे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड कार्याध्यक्ष प्रकाश पाटील,जिल्हाध्यक्ष सुहास देसाई,रेखा खोपकर,सामाजिक कार्यकर्ता संग्राम डोंगरे,शिवसेना(उबाठा) पक्षाचे माजी खासदार राजन विचारे जिल्हाध्यक्ष केदार दिघे,नरेश मणेरा,सचिन चव्हाण आणि इतर सदस्य संस्था यांनी स्वयंस्फूर्तीने आलेले अनेक बुद्धजीवी आंदोलक सहभागी झाले होते.

## निफाड येथे माणुसकी फांऊडेशन च्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न




**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण निफाड प्रतिनिधी-**
वनसगांवचे भुमिपुत्र मराठा विध्याप्रसारक समाजाचे माजी सेवानिवृत्त मुख्खाध्यापक पी. एस निकाळे सर यांच्या स्मृतीदिनानिमित्ताने माणुसकी फाऊंडेशन निफाड चे संस्थापक अध्यक्ष सागर निकाळे ह्यांनी शिक्षण क्षेत्रातील आदर्श ,कत्तृत्ववान तसेच सामाजिक बांधिलकी जपत आपले सर्वस्व विद्यार्थ्यांना घडववण्यासाठी सतत प्रयोगशिल,प्रयत्नशिल असणाऱ्या गुरुजणांचा सन्मान सोहळा निफाड येथे आयोजित केला होता.सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते मा.बी जी शेखर माजी विशेष महानिरिक्षक नाशिक पोलिस परिक्षेत्र विभाग हे होते.कार्यक्रमाच्या दरम्यान आपल्या व्याख्यानातुन त्यांनी आपले अमुल्य विचार मांडले.गुरु हा राष्ट्राच्या जडण घडणीमध्ये महत्त्वाची भुमिका बजावतो..गुरू हा प्रत्येक गोष्टीचा दुरदृष्टीकोन ठेवून आपले विचार विद्यार्थ्यांना प्रदान करत असतो.छत्रपती शिवाजी महाराजांना राजमाता जिजाऊ ह्या गूरु म्हणुन लाभल्या.अफजलखान वधाच्या वेळी घातपाताची शक्यता आहेच आणि त्याची पुर्ण खबरदारी घेतली पाहिजे त्यासाठीच्या उपाययोजनांचा सल्ला माता जिजाऊंनी च महाराजांना दिला होता.अशा अनेक प्रसंगात अमुल्य असे विचार महाराजांच्या जिवनात माता जिजाऊंनी दिले त्यामुळेच स्वराज्य निर्माण झाले.सद्धस्थितीला आपल्या कडुन होणाऱ्या कृतीशिल तसेच आदर्श कार्यामुळे ,ज्ञानदानामुळे भावी पिढी हि आदर्श नागरिकांची पिढी असेल ह्यात शंकाच नाही.म्हणुन तुम्हां सर्वांचा गौरव होत आहे ह्यासारखा दुसरा आनंद नाही..अशे अनेक विचार त्यांनी आपल्या व्याख्यानातुन व्यक्त केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते शिवाजीराव ढेपले होते तर प्रमुख अतिथी म्हणुन लासलगाव मार्केट कमेटीचे सभापती डी.के.जगताप .ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली.शिक्षक नेते संजय चव्हाण.जेष्ठ नेते भाऊसाहेब बोचरे.शंकर कोल्हे,दत्ता रायते.अँड शेखर देसाई.रिपाईचे सागर गायकवाड.धारणगांव चे पोलीस पाटील राहुल सोनवने.पांडुरंग कर्डीले,सुरेश धारराव.माणीक कुशारे.संपत रोटे. नामदेव गायकवाड. गायत्री लचके. पुनम टापसे.देवयानी आहेर.जयश्री बस्ते ठाकरे सर आदी मान्यवर उपस्थितीत होते.

# अल्प कालावधीत येणारे सोयाबीन पीक शेतकऱ्यांना फायद्याचे!

## लातुर जिल्ह्यात 11 ते 18 सप्टेंबर पर्यंत मुसुळधार पाऊस पडणार !!

### पंजाबराव डक यांचे शेतकर्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर शिरूरआनंतपाळ**
सोयाबीनचे वाण अल्प कालावधीचे तयार झाले असून ते पावसाच्या दिवसात येत असल्याने शेतकऱ्यांना फायद्याचे ठरणार आहे. अल्प वाणाच्या पिकाची सप्टेंबर महिण्याच्या अखेर पर्यंत परिपक्व झालेले सोयाबीन पीक काढून होत असल्याने शेत रिकामे होऊन रबी हंगामासाठी तयार करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीसाठी हे वाण फायद्याचे ठरू शकते असे मत सुप्रसिध्द हवामान तज्ञ पंजाबराव डख यांनी सांगितले. येरोळ येथील संत सावता माळी नर्सरी मध्ये सोयाबीन उत्पादक शेतकरी मेळावा व हवामान अंदाज यावर येथे शेतकरी चर्चा व मेळावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. मराठवाड्यात जवळपास २५ सप्टेंबरपर्यंत पावसाळा असतो. त्यातही परतीचा पाऊस ऑक्टोंबरच्या अखेरपर्यंत पडत असल्याने मध्यम कालावधीच्या पिकांसाठी आवश्यक




त्या वेळेत पाणी मिळते. तसेच अत्यल्प कालावधीतील (युनोवेज १०८ व्हेरायटी) पिकांची उत्पादन क्षमता जास्त असते. दीर्घ मुदती पिकांच्या तुलनेत ती कमी अधिक क्षमता राहते. परंतु, ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे त्यांच्याकरिता पावसाचे खंड पडले तरी या व्हेरायटीचे वाण फायद्याचे ठरू शकतात. पावसाचे दिवस कमी असले तरीही या पिकांचा कालावधी कमी असल्याने शेतकऱ्यांना मालामाल करू शकते.
जमिनीचा पोत, सिंचन सुविधा आणि पीक पद्धतीवर वाणाची निवड अवलंबून असते. ऑफ सिझनमध्ये सोयाबीनचे उत्पादन घेतल्यास ग्रीन मोझॅकचा प्रादुर्भाव वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच दिं. ११ सप्टेंबर ते १८ पर्यंत लातुर जिल्ह्यात मुसळधार पाऊस वादळी वाऱ्यासह वीज पडणार असुन शेतकऱ्यांनी आपली व आपल्या पशुची काळजी घ्यावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाला डिगोळ, सुमठाणा, साकोळ, दैठना,नागेवाडी, चामरगा, कारेवाडी, धामणगाव, तळेगाव शिरूरआनंतपाळ व पंचक्रोशीतील सोयाबीन उत्पादक उपस्थित होते.वनभोजनानी कार्यक्रमाची सांगता झाली.

# सरकारच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप उसळला!

### बायपासवरील खड्डे भरून माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक पुन्हा धावले मदतीला

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
अलिबाग बायपास रोड जंक्शन ते निलिमा हॉटेल या महत्त्वाच्या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रोज अपघाताचा धोका पत्करून नागरिकांना प्रवास करावा लागतो, तरीदेखील ना नगर परिषद, ना सार्वजनिक बांधकाम विभाग या रस्त्याची जबाबदारी घ्यायला तयार नाही. सरकारी यंत्रणा झोपेत गेली आहे का? नागरिकांच्या जीवाचा सौदा कोणी करायचा? या प्रश्नांनी नागरिकांचा संताप उसळला आहे. शासनाच्या निष्क्रियतेमुळे त्रस्त



नागरिकांना पुन्हा एकदा दिलासा देण्यासाठी माजी नगराध्यक्ष प्रशांत मधुसूदन नाईक यांनी पुढाकार घेतला. बिकानेर स्वीट्ससमोर व आसपासचे प्रचंड खड्डे त्यांनी स्वतःच्या प्रयत्नातून डांबरीने भरून घेतले. प्रशासनाचे कान टोचत आणि निष्क्रियतेला चपराक मारत प्रशांत नाईक यांनी प्रत्यक्ष कृतीतून लोकसेवेचे उदाहरण घालून दिले.
नागरिक म्हणतात, "सरकारी अधिकारी आणि विभाग हे केवळ खुर्चीवर बसून पगार घेण्यासाठी आहेत का? जनतेच्या सुरक्षिततेशी खेळ करण्याचा त्यांना अधिकार कोणी दिला?" असा थेट सवाल नागरिकांनी केला. अनेकांनी प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत, "जेव्हा सरकार काहीच करत नाही तेव्हा आम्हाला नाईकसारखे खरे लोकप्रतिनिधीच उपयोगी पडतात," असे स्पष्ट शब्दांत सांगितले.अलिबागमधील नागरिकांच्या छोट्या-मोठ्या समस्या सोडवण्यासाठी कायम तत्पर असलेले माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांचे हे कार्य केवळ वाखाणण्यासारखे नाही, तर ठाण मांडून बसलेल्या सरकारी यंत्रणेला जाग आणणारे आहे.

## पनवेलच्या 'उद्देश अभ्यासिकेत'अभाअंनिसचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल):**
पनवेल येथील 'सेवा सहयोग' फाउंडेशनच्या उद्देश अभ्यासिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कारांमागील विज्ञान'हा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न झाला.
सदर कार्यक्रमांमध्ये अभ्यासिकेमध्ये येणारे इ. पहिली ते बारावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांमधील भूत, भानामती ,करणी इत्यादींबाबतची भीती दूर करण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विविध चमत्कारांची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली भोंदूबाबा कशाप्रकारे समाजाचे शोषण करतात याबाबत माहिती देण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या जादूटोणाविरोधी कायद्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. सदर प्रसंगी जिल्हा संघटक नरेंद्र जाधव, सचिव अल्ताफ पठाण, ज्येष्ठ सल्लागार कैलास मोहिते यांनी मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यक्रमास प्रसिद्धी प्रमुख पंडित फंगाळ, ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील हिरे हे आवर्जून उपस्थित होते.
कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सेवा सहयोग फाउंडेशनच्या मुंबई समन्वयक रेश्मा मॅडम , देवयानी खेडेकर,प्रगती खेडेकर ,तसेच अंनिस चा युवा कार्यकर्ता गुलाब



बागवान आणि उद्देश अभ्यासिकेच्या समन्वयक व सर्व स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आष्टीत खाजगी सावकाराचे आत्मदहन नाट्य व्याजाच्या पैशांकरिता ब्लॅकमेलिंग

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी शहर व तालुक्यात खाजगी सावकारकीच्या जाळ्यात अनेकजण अडकले असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. अशातच शहरातील योगेश कुंभकर्ण नामक खाजगी सावकाराने व्याजाच्या पैशाकरिता आत्मदहनाचे नाट्य करून ब्लॅकमेलिंग केले असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेख युनूस यांचे शहरात टायरचे दुकान आहे. युनूस यांना तबरेज आणि अबरार नावाची दोन मुले आहेत. शेख कुटुंब शहरात अनेक वर्षापासून वास्तव्यास असून विविध व्यवसायात नावाजलेले आहे. गुलाबी बिर्याणी हाऊस नावाने तबरेज शेख यांचे हॉटेल आहे तर अबरार शेख यांचे सिमेंट व बिल्डिंग मटेरियलचे दुकान आहे. तबरेज यांना व्यवसायात नुकसान झाल्याने त्यांनी काही मित्रांकडून हातउसने पैसे घेतले होते. परंतु त्यातील काही मित्रांनी तबरेज यांच्याकडे जास्तीच्या पैशासाठी तगादा लावल्याने तबरेज शेख यांनी तीन महिन्यापूर्वी 25 जून रोजी त्यांच्या हॉटेल येथे विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेत तबरेज यांना अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. वडील युनूस शेख यांनी सदरील पूर्ण व्यवहार मिटवून आणखी कुणाचे पैसे द्यायचे आहेत का अशी विचारणा तबरेजला केली असता याव्यतिरिक्त आता कोणाचे पैसे माझ्याकडे नाहीत असं तबरेज याने सांगितले. या प्रकरणानंतर सहा दिवसांनी योगेश कुंभकर्ण या व्यक्तीने युनूस शेख यांना फोन करून तुमचा मुलगा तबरेज याच्याकडे माझे 60 लक्ष 25 हजार रुपये येणे असल्याचे सांगितले. कुंभकर्ण यांनी मागणी केलेल्या रक्कम संदर्भात युनूस यांनी मुलगा तबरेज याला विचारणा केली असता कुंभकर्ण यांचे माझ्याकडे कसलेही पैसे नसल्याचे तबरेजने सांगितले. तबरेज आपल्या जाळ्यात येत नसल्याचे समजताच योगेश कुंभकर्ण याने युनूस शेख यांच्याकडे पैशासाठी तगादा लावला. सतत फोन करणे, दुकानात येऊन ग्राहकांसमोर पैशाची मागणी करणे अन माझे पैसे द्या नसता मी तुमची बदनामी करेन अश्या धमक्या देऊ लागला. कुंभकर्ण यांच्या धमक्यांना कंटाळून 6 सप्टेंबर रोजी युनूस शेख यांनी 61 लक्ष 25 हजार रुपये तुझे एकट्याचे आहेत का इतरांचे पण आहेत अशी विचारणा केली असता कुंभकर्ण याने कोणाचेही नाव न घेता एका कागदावर सदरील रकमेचा व्याजासाहित तपशील युनूस शेख यांना दिला. ही रक्कम आजच्या आज मला द्या नसता मी तुमच्या दुकानात माझ्या अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करेन अशी धमकी देऊ लागला यावर उपस्थितांनी योगेश कुंभकर्ण यांच्या हातातील डिझेलचा कॅन ज्याच्यात एक हात ही भाजनार नाही एवढे डिझेल होते ते कॅन हिसकावून घेत आत्मदहन नाट्य उधळून लावला.

चौकट - 1

**रक्कम कशी आली..**

योगेश कुंभकर्ण हा महिना 25-30 हजार रुपयांच्या पगारावर एका खासगी फायनान्स कंपनीत कामाला आहे. त्याने युनूस शेख यांना दिलेल्या हिशोबाचा (व्याजासाहित) आकडा 60 लक्ष एवढा आहे. खासगी कंपनीत नोकरी करण्याऱ्या योगेश कडे एवढी मोठी रक्कम आली कशी..? योगेशच्या मागे सावकारांचे मोठे रॅकेट तर नाही ना तसेच फायनान्स कंपनीत घोटाळा करून तेथील पैसे खासगी सावकरकीसाठी तर वापरत नाही ना...? याप्रकारची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे.

**आर्थिक अडचणीत सापडल्यांचा गैरफायदा**

योगेश कुंभकर्ण हा सोने तारण करून कर्ज देणाऱ्या एका खासगी फायनान्स कंपनीत नोकरी करत असल्याने आर्थिक अडचण असलेले शेकडो लोक दररोज ग्राहक म्हणून योगेश यांच्या कार्यालयात येतात. यामधील काही प्रतिष्ठित ग्राहकांना हेरून योगेश कडून त्यांना विविध प्रलोभने देऊन खासगी सावकारकीकडे वळवण्याचा प्रयत्न होत होता. तबरेज शेख यांच्या सारखे आणखी किती ग्राहक योगेश यांच्या प्रलोभनांना बळी पडले याचा शोध प्रकरणाकडे दुर्लक्ष करणारे पोलीस प्रशासन घेतील का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

शहरातील शैक्षणिक तसेच खासगी क्षेत्रात मोठ्या पदावर कार्यरत असलेले काही लोक खासगी सावकारकीच्या व्यवसायात सक्रिय असल्याचा संशय युनूस शेख यांनी व्यक्त केला असून सदरील लोकांचा शोध घेणे आवश्यक असल्याचे ही शेख यांनी सांगितले.

योगेश कुंभकर्ण यांनी पदाचा गैरवापर करून ग्राहकांना खासगी सावकारांच्या दारात उभे करण्याचे काम केले आहे. अव्वाच्या सव्वा व्याजदर लावून व्याज घेणाऱ्या खासगी सावकारांच्या जाळ्यात अडकलेल्या लोकांनी समोर यावे जेणेकरून त्यांची होणारी आर्थिक हेळसांड थांबण्यास मदत होईल, असे आवाहन युनूस शेख यांनी केले आहे.

## निवृत्तीनंतर २० वर्षे मोफत ज्ञानार्जन करणारे पनवेलचे माळी सर काळाच्या पडद्याआड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:वार्ताहर**

पनवेल शहराच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील एक अजरामर व्यक्तिमत्त्व, अरविंद कृष्णाजी माळी (ए. के. माळी सर) यांचे २ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मावळली. सर्व लहान-मोठ्यांना लाडाने 'नाना' म्हणून ओळखले जाणारे हे महान शिक्षक, ज्ञानप्रसारक आणि निसर्गप्रेमी व्यक्तिमत्त्व होते. आज गुरुवारी (११ सप्टेंबर) त्यांचा मरणोत्तर श्राद्धविधी पार पडला, ज्यात पनवेलकरांनी त्यांच्या योगदानाबद्दल हळहळ व्यक्त केली. नानांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रात शोकाकुलता पसरली असून, त्यांच्या शिष्यपरिवाराने त्यांना श्रद्धांजली वाहिली. अरविंद कृष्णाजी माळी यांचा जन्म २ जानेवारी १९३४ रोजी अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे गावी झाला. बालपणापासूनच शिक्षणाबाबत उत्साही असलेल्या नानांनी टिळक बोर्डाच्या परीक्षेत संस्कृत आणि इंग्रजी विषयात पहिले स्थान मिळवले. त्यानंतर त्यांनी शहाबाज माध्यमिक विद्यामंदिर आणि शिरोडकर हायस्कूल, मुंबई येथे शिक्षकी पेशा स्वीकारला. मात्र, पनवेलच्या व्ही. के. हायस्कूलमध्ये २७ वर्षे अथक परिश्रम करून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांचा शिक्षणावरील जिव्हाळा कमी झाला नाही. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी २० वर्षे कोणत्याही मोबदल्याशिवाय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले. संस्कृत आणि इंग्रजी हे त्यांचे आवडते विषय असल्याने अनेक विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले. घरी विद्यार्थ्यांना बोलवून आत्मीयतेने शिकवत असताना कधीच फी घेतली नाही, ही नानांची खास शैली होती. नाना हे केवळ शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्रोत होते. त्यांच्या शांत, हसतमुख आणि लोभस स्वभावामुळे पनवेलमधील प्रत्येक विद्यार्थी त्यांना 'नाना' म्हणून स्नेहाने हाक मारत असे. त्यांनी आयुष्यभर शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात वाहून घेतले. अनेक विद्यार्थ्यांना संस्कृत आणि इंग्रजीत प्राविण्य मिळवून देण्यात त्यांचे विशेष कौतुक आहे. सेवानिवृत्तीनंतरही ज्ञानार्जनाचे त्यांचे आवडते काम सुरूच ठेवले. पनवेलच्या व्ही. के. हायस्कूलमधील त्यांचे २७ वर्षांचे कार्य हे शैक्षणिक इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल. शिक्षणाबरोबरच नाना कलाप्रिय आणि शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व होते. त्यांना व्हायोलीन वादनाचा छंद होता, ज्यामुळे त्यांचे जीवन संगीतमय झाले. स्वच्छतेचे ते भोक्ते होते आणि महापुरुषांबाबत नितांत आदर बाळगत असत. नानांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे गेल्या ५० वर्षातील त्यांची दैनंदिनी. अनेक वर्षे न चुकता लिहिलेली ही दैनंदिनी त्यांच्या जीवनातील घटनांचा अमूल्य ठेवा आहे. समाजसेवेतही त्यांचे मोलाचे योगदान होते. पनवेलमधील प्रभाकर पटवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट रुग्णालयात वर्षभर मोफत रुग्णसेवा देखील केली आहे. निसर्गप्रेमी असलेल्या नानांना झाडे, फुले आणि कुंडीतील लागवड आवडत असे. ते विद्यार्थ्यांना निसर्गाचे महत्त्व शिकवत असत.



नानांच्या कुटुंबात संगीताची परंपरा आहे. त्यांची नात मिथिला माळी ही संगीत सृष्टीतील नामांकित पार्श्वगायिका आहे. अनेक रिऍलिटी शोजमध्ये मिथिलाने झळक घेतली असून, तिच्या यशामागे आजोबांचेही अर्थात नानांचे योगदान असल्याचे तिने बोलताना भावनिकपणे सांगितले.

## सेलू येथे जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती सेलूच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात महाराष्ट्र राज्य सरकारने आणलेल्या जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात तीव्र धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात आले.यावेळी ना. तहसीलदार विजय मोरे व मंडळ अधिकारी बोधले यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी हेमंतराव आडळकर, रामकृष्ण शेरे, रामेश्वर पौळ,मिलिंद सावंत, उद्धव पौल, दत्तुसिंग ठाकूर,शेख रहीम,विनोद तरटे, वैभव वैद्य, रामेश्वर बहिरट,विठ्ठल काळबांडे,मंगलताई कथले, मुश्ताक रब्बानी,दिलावरभाई, किशोर भांडवले, इरफान लाला, वैभव वैद्य आदी उपस्थित होते.



## महाराष्ट्र सरकारचा जनसुरक्षा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी चंद्रपूरात माजी आमदार सुभाषभाऊ धोटे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे जोरदार निदर्शने

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
**चंद्रपूर**

--महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटना विरोधी व लोकशाहीला बाधक असून जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे. सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्याचा हेतूने कुटील डाव साध्य करण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून साधला जाणार आहे. शासनाच्या विरोधात बोलणाऱ्या सामान्य नागरिकांना तसेच विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक करून दडपशाही व बळाचा वापर करून त्यांचे विरुध्द खोट्या कारवाया करण्यात येतील अशी भीती विविध संघटना आणि




विरोधी पक्षांनी व्यक्त केलेली आहे. सर्वसामान्य नागरिक तसेच सामाजिक चळवळीत काम करणारे कार्यकर्त्यांमध्ये अशा स्वरूपाच्या विधेयकामुळे प्रचंड असंतोष व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या अनुषंगाने आज बुधवार दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी महाविकास आघाडीच्या वतीने गांधी चौकातील महात्मा गांधी यांना वंदन करून महाविकास आघाडीच्या वतीने माजी आमदार तथा कांग्रेस जिल्हाध्यक्ष सुभाषभाऊ धोटे यांचे नेतृत्वात भव्य निदर्शने करण्यात आली "रद्द करा-रद्द करा -जनसुरक्षा कायदा रद्द करा' अशा प्रकारची नारेबाजी करून निदर्शने करण्यात आली यावेळी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांतील नेते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य, शहर जिल्हाध्यक्षा बेबीताई ऊईके, उबाठा शिवसेनेचे सुरेश पचारे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कन्नाके यांनी यांनी आपले विचार व्यक्त केले तर प्रमुख मार्गदर्शक माजी आमदार सुभाषभाऊ धोटे यांनी या कायद्यामुळे आपल्या अधिकारावर गदा येणार असुन सरकार विरोधी कुठल्याही प्रकारची वक्तव्ये किंवा बोलण्याची मुभा राहणार नाही आंदोलन करण्यास जमणार नाही तेव्हा असा कायदा रद्द झालाच पाहिजे यासाठी सर्वांनी एकत्रीतपणे येवून मोठे आंदोलन करण्यासाठी सज्ज असावे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणातून केले. यावेळी शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष रितेश तिवारी, शहर प्रविण पडवेकर, नंदु नागरकर, जेष्ठ नेते सर्वश्री हिराचंद बोरकुटे, विनायक बांगडे, विनोद दत्तात्रेय, सुभाषसिंह गौर, संतोष लहामगे, प्रशांत भारती, अनिल नरुले, राजु रेड्डी, सुनंदाताई धोबे, सुनिताताई अग्रवाल,शिरीज गोगूलवार, दीपक कटकोजवार, नौशाद शेख, बापु अन्सारी, कुणाल चहारे, पिंटू शिरवार, रोशनलाल बिट्टू, रेखाताई वैरागडे, वसंत देशमुख विणाताई खनके यांचेसह महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शविली होती.

## एस. पी. मोरे कॉलेज आणि उमीद फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खांडेश्वर तलाव परिसरात स्वच्छता अभियान यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**दिपाली पारसकर**

पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना, एस. पी. मोरे कॉलेज ऑफ पॅरामेडिकल अँड नर्सिंग एज्युकेशन आणि उमीद फाउंडेशन यांच्या सहकार्याने खांडेश्वर तलावावर एक भव्य स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले. या अभियानांतर्गत तलाव आणि त्याच्या आसपासच्या परिसरातील कचरा, प्लास्टिक आणि गणपती महोत्सवानंतरचे अवशेष स्वच्छ करून पर्यावरणाच्या जतनाची महत्त्वपूर्ण दृष्टी समोर आणली. अभियानाची संकल्पना कॉलेजच्या सहायक प्राध्यापक रुमैसा नाकडे यांच्या निरीक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जागरूकतेची आवश्यकता लक्षात घेत, या उपक्रमाची योजना मांडली गेली. या महत्त्वपूर्ण उपक्रमाला कॉलेजचे संचालक श्री. आर्यन शेळके आणि उमीद फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. रोहित युवराज बैसणे यांच्याद्वारे संपूर्णपणे पाठिंबा मिळाला.

अभियानाची यशस्विता सुनिश्चित करण्यासाठी, एस. पी. मोरे कॉलेजच्या सहायक प्रशासन प्रमुख



श्री. अनिल मखामले यांनी पनवेल महानगरपालिकेशी योग्य समन्वय साधत आवश्यक संसाधनांची व्यवस्था केली. यावेळी कॉलेजच्या 60 विद्यार्थ्यांनी उमीद फाउंडेशनच्या सदस्यांसोबत खांडेश्वर तलाव परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी घेतली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले.

तसेच, आयरिस हॉस्पिटल पनवेल यांनी आवश्यक स्वच्छता उपकरणांची पुरवठा करून या उपक्रमाला महत्त्वपूर्ण सहकार्य केले, ज्यामुळे स्वच्छता मोहिमेची यशस्विता आणखी वाढली.

हे स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी एस पी मोरे कॉलेज प्रशासन प्रमुख सोनल हादणकर, मुखराम काझी, सत्यवान (एस. पी. मोरे कॉलेज टीम)

सामाजिक उमीद फाउंडेशन चे तौफीक मोहम्मद इतर सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य आणि योगदान अत्यंत मोलाचे ठरले.

आम्ही या अर्थपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे मनापासून आभार व्यक्त करतो. आपले प्रयत्न भविष्यकाळात एक शाश्वत, स्वच्छ आणि हरित पर्यावरण निर्मितीच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरतील, आणि आम्ही एकत्र येऊन पर्यावरण संवर्धनासाठी आपली वचनबद्धता कायम ठेवू.

एस. पी. मोरे कॉलेज टीमने पनवेल शहराच्या स्वच्छतेसाठी आपले सखोल वचन व्यक्त केले आहे. पनवेल, जो सध्याचे 6 व्या स्वच्छ शहरांपैकी एक आहे, त्याला टॉप 3 मध्ये स्थान मिळवण्यासाठी आम्ही सक्रियपणे योगदान देणार आहोत. पनवेलच्या प्रत्येक गल्लीत, प्रत्येक रस्त्यावर, आणि प्रत्येक गल्लीतील स्वच्छतेच्या कार्यात आम्ही कायमच भाग घेणार आहोत, आणि पनवेल महापालिकेला (PMC) या प्रयत्नात आम्ही नेहमीच पूर्णपणे समर्थन देऊ. असे एस. पी. मोरे कॉलेज ऑफ पॅरामेडिकल अँड नर्सिंग एज्युकेशन यांच्या वतीने सांगण्यात आले.

## जोगेश्वरीच्या गरीब घरातून राष्ट्रीय ते आशियाई स्पर्धेपर्यंत – सोहम कारेकरचा उज्ज्वल प्रवास

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई जोगेश्वरी परिसरातील गरीब कुटुंबातून आलेला सोहम कारेकर हा तरुण खेळाडू आज संपूर्ण देशाचं नाव उज्ज्वल करीत आहे. केवळ १८ वर्षांचा असलेला सोहम, पॉवरलिफ्टिंग या कठीण खेळात उल्लेखनीय कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.







सन २०२१ मध्ये मडगाव (गोवा) येथे झालेल्या राष्ट्रीय बेंच प्रेस चॅम्पियनशिप मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना त्याने सब-ज्युनियर गटात चौथे स्थान पटकावले. त्यावेळी त्याचे वय केवळ १४ वर्ष होते.

पुढे सतत कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर सोहमने अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील पदके पटकावली. २०२४ मध्ये वास्को (गोवा) येथे झालेल्या स्पर्धेत त्याने रौप्यपदक जिंकत राष्ट्रीय विजेता ठरला.

या यशामुळे सोहमची भारताच्या संघात निवड झाली असून तो ८ ते १२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान हाँगकाँग येथे होणाऱ्या आशियाई बेंच प्रेस स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

सोहमचे वडील नाही आहेत, त्याची आई ट्रॉमा केअर हॉस्पिटल मध्ये काम करते. मात्र तिचा पगार महिन्याला वेळेवर मिळत नाही; कधी दोन महिने, तर कधी तीन महिने उशिरा मिळतो. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत कठीण आहे.

सोहम सध्या ट्रू पॉवर जिममध्ये प्रशिक्षण घेत असून, खेळातील साहित्य, डाएट आणि प्रवास खर्च भागविणे ही त्याच्यासाठी मोठी कसरत आहे. तरीसुद्धा कुटुंबाच्या आणि समाजाच्या पाठबळावर तो भारतासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

खेळाडूला पुढील स्पर्धांसाठी आर्थिक मदत मिळावी, हीच आजच्या घडीला मोठी गरज आहे. गरीब परिस्थितीतून आलेला हा सोनेरी आशावादी तरुण योग्य मदत मिळाल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा नक्कीच फडकवेल, असा विश्वास त्याचे मार्गदर्शक आणि प्रशिक्षक संकेत चव्हाण आणि अक्षयकुमार प्रजापती यांनी व्यक्त केला आहे.

# युवक आधार

वर्ष : २ अंक : 356 शुक्रवार दि. 12 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6




# दैनिक युवक आधार वर्धापन दिना चा सोहळा उत्साहात साजरा










































